# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २०/११/२०१५

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ६/११/२०१५ व ९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०६/११/२०१५ व दि. ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २ | प्रभाग समिती एफ मौजे गोखिवरे सर्व्हे नंबर २५८ मधील सर्व समुदयाच्या दफनभूमीसाठी असलेल्या जागेस संरक्षक भिंत बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदरच्या कामी येणाऱ्या रु. ५०,७८,३७५/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्या घेवून निविदेच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे. त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३ | प्रभाग समिती जी मधील वालीव विभागीय प्रभाग जी कार्यालयाच्या मजल्यावरील नुतनीकरणाचे कामाचे अंदजपत्रकीय रकमेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. लॉरेल डायस सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४ | वसई विकासीनी संचलित वसई विकासिनी दृक कलामहाविद्यालय, वसई आयोजित बारावी राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धा २०१६ व विविध स्पर्धासाठी महानगरपालिकेकडून आर्थिक सहाय्य देणेबाबत निर्णय घेणे. | **ठराव** :- वसई विकासीनी कॉलेज ऑफ आर्ट व वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यामाने नोव्हेंबर २०१५ रोजी इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बालचित्रकला स्पर्धा २०१५, तसेच १२ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय, निसर्गचित्रण स्पर्धा, वाळूशिल्प स्पर्धा आणि प्रत्यक्ष व्यक्तिचित्रण स्पर्धा २०१६ आयोजित करणेकामी आजची सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच सदरचे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविणेकामी रु. ३,५०,०००/- इतके अनुदान वसई विकासीनी संचलित वसई विकासीनी दृक कलामहाविद्यालय यांचे नांवे धनादेशाद्वारे अदा करणेकामी आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ५ | वसई विरार शहर महानगरपालिकेत web based biometric हजेरी यंत्रणा बसविणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. याकामी रक्कम रु. १७,०००००/- इतक्या खर्चास व ई-निविदेद्वारे एजन्सी निश्चित करण्यांस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले   सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ६ | सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरिता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सार्व. आरोग्य विभागासाठी आवश्यकते प्रमाणे स्वच्छता साहित्य व इतर साहित्य पुरवठाकामी प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराच्या निविदाकारांबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** वरील प्राप्त ई-निविदा दरांची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख केलेल्या निविदाकारांच्या समोर नमुद केलेले घटकांचे दर तुलनात्मक कमी आहेत व घटक क्र. ५९ चे दर प्राप्त आहेत.<br>१ मरीन इंजिनिअरींग ॲण्ड इक्विपमेंट कं.- घटक क्र. ५६ (१), ८० ( १ ते ७), ८१, ८२ ( १ ते ३), ८३ (१,२), ८४.<br>२) एम.आर.एफ. इंटरप्रायजेस - घटक क्र. १०, २१, २३, २७, ५०, ६८, ७५ (५,६), १०० (२)<br>३) एम.के.शहा इंटरप्रायजेस- घटक क्र. ४,५,६,७,८,११,१३,१४,१५,१९,२०,२९,३१,३२,३४,३४,३६,३७३९,४४,४५ (अ,ब), ४६,४९,५१,५२,५६ (३), ५८,६०, (१,२) ६१,६४ (१,२,३),६५,६९ (१), ७०,७१,७३,७५, (१,२,४,७), ७८,७९,८५,८६,८८,९१,९३,९५ (१,२), ९६,९७,९८,१०० (१), १०१,१०२ (१,२,३), १०३ (१,२,३), १०९,११२,११४ (२).<br>४) व्हि एम.ट्रेडर्स - घटक क्र. ५७,७२,७६,९२.<br>५) साक्षी एंटरप्रायजेस - घटक क्र. १,२,९,१२,१६,२२,२४,२६,२८,२९ ,४०,४७,४८,५०,५३,५५,६२,६३,६४,(४), ६६,७७,९९ (१ ते १०), १०१,१०३ (२) , १०४,१०६,१०७,१०८,१११,११३,११५.<br>६) श्रीनाथ इंटरप्रायजेस - घटक क्र. ५४,५६ (२),७०,११४ (१).<br>७) के .के. ब्रदर्स - घटक क्र. १७,१८,२५,३०,३८,४१,४२,४३,५३,५६ (४),६५,६७,६९ (२),७,७५ (१,३,८),८३ (३,४),८७,८९,९०,९४,१०५ (१ ते ६) ११०<br>प्राप्त दर बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून शिफारस केली आहे. सदरचे दर हे सन २०१५-१६ साठी मागविण्यांत आले होते. परंतु सन २०१५-१६ वर्षामधील कालावधी हा कमी राहिलेला आहे. त्याकरीता मार्च २०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी कमी दराचे ई-निविदाकारांबरोबर संविदा करणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये ही सभा मान्यता देत आहे. तसेच घटक क्र. ५९ चे दोनच दर असल्याने फेर दर मागविण्यास या सभेची मंजूरी आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल   सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ७ | राजीव आवास योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांचे सामाजिक, आर्थिक, बायोमॅट्रीक व अनुषंगिक बाबींचे सर्वेक्षण करुन कृती आराखडा/विस्तृत प्रकल्प अहवाल बनविणे | **ठराव** :- याबाबत सभागृहात चर्चा झाली असता मे.स्पर्श प्रतिष्ठान, कल्याण यांना झालेल्या कामापोटी त्यांनी सादर केलेले देयक रक्कम रु. २५,२९,८८८/- प्राप्त परिस्थितीअन्वये प्रदान करणेंस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत   सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| | व प्रकल्प राबविणे कामाचे व्यवस्थापन सल्लागाराचे देयक प्रदान करणेबाबत. | |
| ८ | विरार (पूर्व) रेल्वे फाटक क्रमांक ४० ते वसई विरार शहर महानगरपालिका ऑफिसपर्यंत रॅम्पब्रिजचे बांधकाम करणेकामी (फेरनिविदा) मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** मे. अजयपाल मंगल ॲण्ड कंपनी ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा १५.१०% जास्त दराने) (वाटाघाटी ४.९०%) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. त्यास अंतिम मान्यता देण्यांत येत असून याकामी म.न.पा.तर्फ कायदेशार बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |